# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

## मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

## शुद्धीपत्रक

दि.१४/१०/२०२१ रोजीच्या जाहिरातीमध्ये "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त हे रिक्त पद भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत." **च्या ऐवजी** "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त हे भविष्यात दि.२६/०१/२०२२ पासून रिक्त होणारे पद भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत." असे वाचावे. जाहिरातीमधील अन्य तपशिलात कोणताही बदल नाही.

उप सचिव, महाराष्ट्र शासन

GOVERNEMENT OF MAHARASHTRA

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

MANTRALAYA, MUMBAI-400 032

# CORRIGENDUM

**In the Advertisement dated 14/10/2021, it has been mentioned, "Applications are invited for filling up vacant post of State Chief Commissioner for Right to Service." However, the sentence now should read like this, "Applications are being invited to fill the future vacancy of the post of State Chief Commissioner for Right to Service in the Maharashtra State from date 26/01/2022." There is no change in other details in the Advertisement.**

**Deputy Secretary, Government of Maharashtra**

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

## मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त हे रिक्त पद भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पदाच्या विचारार्थ पाठवावयाच्या तपशिलाचे प्रपत्र, जोडपत्र व विस्तृत जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत इच्छुक उमेदवारांनी अर्ज करावेत. ज्या व्यक्तींनी या जाहिरातीपूर्वी सदर पदासाठी अर्ज सादर केला असेल, त्यांनी पुन्हा नव्याने अर्ज सादर करावा.

उप सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२१

# जाहिरात

विषय :- राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त या पदावरील नियुक्ती

१. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग हा निकाय, या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी गठित केला आहे. आयोगाचे मुख्यालय बृहन्मुंबई येथे आहे. आयोगामध्ये राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त व ६ राज्य सेवा हक्क आयुक्त (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा यांचे क्षेत्र वगळून) प्रत्येक महसूली विभागासाठी एक यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे अधिकार व कार्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार आहेत.

## रिक्त पदांची संख्या

२. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त हे पद दि.२६/०१/२०२२ रोजी रिक्त होणार आहे. यास्तव या पदावर नवीन राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

## पात्रता

३. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम क्र.१३ (५) प्रमाणे मुख्य आयुक्त, हे शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरण यातील प्रशासनाचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील आणि कलम १३ (६) प्रमाणे मुख्य आयुक्त हे, संसदेचे सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या विधानमंडळाचे सदस्य असणार नाहीत, किंवा इतर कोणतेही लाभपद धारण करणार नाहीत, किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत असणार नाहीत किंवा कोणताही उद्योगधंदा अथवा व्यवसाय करणार नाहीत.

## कालावधी

४. महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम १४ (१) प्रमाणे मुख्य आयुक्त ज्या दिनांकास आपले पद धारण करतील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत अथवा त्यांच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, ते पद धारण करतील, आणि ते पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाहीत.

वेतन

५. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम १४ (४) येथील तरतुदीनुसार राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांना निवृत्ती वेतन/सेवानिवृत्ती लाभ मिळत असल्यास, त्याचे समायोजन करुन राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती या राज्य शासनाच्या मुख्य सचिवांप्रमाणे असतील. ( राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे मूळ वेतन प्रतिमाह रु.२,२५,०००/- आहे.)

निवड व नियुक्तीची कार्यपध्दती

६. या जाहिरातीत नमूद करण्यात आलेल्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त अर्ज शासन परिपत्रक क्र.आरटीएस-११२०/प्र.क्र.५५/१८(र.वका), दि.२३/१०/२०२० अन्वये या प्रयोजनार्थ गठित केलेल्या मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील छाननी समितीसमोर ठेवण्यात येतील. छाननी समिती अर्जदारांच्या संक्षिप्त यादीसाठी वस्तुनिष्ठ निकष अनुसरेल आणि यासाठी लागू केलेल्या निकषांसह उमेदवारांची संक्षिप्त यादी तयार करेल आणि सदर निकषांसह संक्षिप्त यादी योग्य वेळी संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

७. उक्त छाननी समिती सदर संक्षिप्त यादीची नामिका अंतिम निवड प्रक्रियेसाठी अधिनियमातील कलम १३ (३) अनुसार गठित मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर करील. तद्नंतर मा.राज्यपाल सदर समितीच्या शिफारशीनुसार राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्ताची नियुक्ती करतील.

सर्वसाधारण

८. येथे यापूर्वी नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पदावरील नियुक्तीसाठी पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी त्यांचा तपशिल सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्र व जोडपत्रात, लिफाफ्यावर "राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, पदासाठी अर्ज" असे लिहून पोस्टाने सचिव (प्र.सु. र व का), सामान्य प्रशासन विभाग, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ आणि rts.mumcomm-mh@gov.in या ई-मेल पत्त्यावर ई-मेलद्वारे सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पाठवावेत.

९. राज्य/केंद्र शासन किंवा अन्य कोणत्याही संघटनेत सेवेत असलेल्या व्यक्तींनी त्यांचा तपशिल विहीत मार्गाने (प्रशासकीय मंत्रालय/विभाग/राज्य/संघराज्य) पाठवावा. अंतिम दिनांकापूर्वी अर्जाची आगाऊ प्रत पाठविली असल्यास, विहीत मार्गाने करावयाचा अर्ज, पुढील कार्यवाहीच्या विचारार्थ शक्य तितक्या लवकर सादर करावा.

******

प्रपत्र - "अ"

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त या पदाच्या विचारार्थ पाठवावयाच्या तपशिलांचे प्रपत्र"

छायाचित्र

१. नांव :

२. जन्मदिनांक :

३. सध्याचा पत्ता :

४. संपर्क क्रमांक :

५. ई-मेल :

६. शैक्षणिक अर्हता :

७. प्रख्यात असलेले क्षेत्र :

८. सध्याचा व्यवसाय :

९. कामगिरी/कार्यानुभव :
(जोडपत्र प्रमाणे)

दिनांक :

ठिकाण : सही :

संपूर्ण नांव :

## जोडपत्र “ब”

| अ.क्र. | पद | संघटना | कालावधी | | कामगिरी/कार्यानुभव यांचा तपशिल (थोडक्यात) |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |

## जोडपत्र “क”

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या कामगिरीचा तपशिल (थोडक्यात)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**GOVERNEMENT OF MAHARASHTRA**

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

**MANTRALAYA, MUMBAI-400 032**

**Applications are invited for filling up vacant post of State Chief Commissioner for Right to Service.**

**Proforma for sending particulars for consideration for the post of State Chief Commissioner for Right to Service, Annexure and detailed advertisement are available on the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in**

**Interested candidates should submit their application within 30 days from the date of publication of this advertisement. Persons who have already submitted their application for the above post prior to publication of this advertisement should submit their application afresh.**

**Deputy Secretary, Government of Maharashtra**

**Government of Maharashtra**
**General Administration Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Date :- 14 October, 2021**

# ADVERTISEMENT

**Subject :- Appointment for the post of State Chief Commissioner for Right to Service**

The Government of Maharashtra has constituted a body under the Maharashtra Right to Public Services Act, 2015 known as Maharashtra State Commission for Right to Service to exercise the powers conferred on and to perform the functions assigned to it under the Act. The head quarter of this Commission is located in Greater Mumbai. The Commission comprises of the State Chief Commissioner for Right to Service and six State Commissioners for Right to Service. The powers and functions of the Commissioners for Right to Services in the MSCRS are as per Maharashtra Right to Public Services Act, 2015.

## NUMBER OF VACANCIES

2. The Post of the State Chief Commissioner for Right to Service will be vacant from Dt.26/01/2022. Therefore, it is proposed to appoint State Chief Commissioner for Right to Service against this vacancy.

## ELIGIBILITY

3. As per article 13 (5) of the Act, the Chief Commissioner shall be a person of eminence in public life with wide knowledge and experience in administration in Government or Public Authority.

Further, as per article 13 (6) of the Act, the Chief Commissioner shall not be a Member of Parliament or Member of Legislature of any State or hold any other office of profit or connected with any political party or carrying on any business or profession.

It is clarified that cessation/termination of holding of office of profit, pursuing any profession or carrying any business is a condition precedent to the appointment of a person as State Chief Commissioner for Right to Service.

## TENURE

4. As per article 14 (1) of the Act, The Chief Commissioner shall hold office for a term of five years from the date on which he/she enters upon his/her office or till he/she attains the age of 65 years whichever is earlier, and shall not be entitled for re-appointment.

## EMOLUMENTS

5. As per article 14 (4) of the Act, the salary and allowances payable to the Chief Commissioner shall be the same as that of the Chief Secretary of the State, subject to adjustment of the pensionary/retirement benefits availed by him/her, if any. (Present emolument of the State Chief Commissioner for Right to Services is Rs.2,25,000/- per month.)

## PROCEDURE OF SELECTION AND APPOINTMENT

6. Applications received upto the last date as per this advertisement shall be placed before a Scrutiny Committee under the Chairmanship of Hon.Chief Secretary duly constituted for this purpose vide Government Resolution no RTS 1120 / C. R. 55 / 18 (O&M) dated 23rd October, 2020. The Scrutiny Committee will prepare a panel of short listed candidates along with the criteria applied and the same shall be notified on the website at the appropriate time.

7. The short listed panel shall thereafter be placed for final selection process before the committee constituted as per Section 13(3) of the Act under the Chairmanship of Hon.Chief Minister.

Upon receipt of such recommendations from the Committee, Hon'ble Governor of Maharashtra shall appoint State Chief Commissioner for Right to Service.

## GENERAL

8. Persons fulfilling the eligibility criteria and interested for appointment to the post of State Chief Commissioner for Right to Service as per procedure outlined herein before may send their particulars in the enclosed proforma by post to Secretary ( A.R. O & M), General Administration Department, 1st Floor, Mantralaya (Annex Building), Mumbai-400 032 or through e-mail to **rts.mumcomm-mh@gov.in** within 30 days from the date of the advertisement.

9. Persons who are serving under the State/Central Government or any other Organisation, should send their particulars through proper channel (administrative Ministry/Department/State/UTs). In case an advance copy of the application is sent before the due date the applications through proper channel should be furnished as soon as possible to be considered for further processing.

*****************************

ANNEXURE "A"

**PROFORMA FOR SENDING PARTICULARS FOR CONSIDERATION FOR THE POST OF STATE CHIEF COMMISSIONER FOR RIGHT TO SERVICE.**

1. **Name** :
2. **Date of Birth** :
3. **Present Address** :
4. **Contact Number** :
5. **E-Mail** :
6. **Educational Qualification** :
7. **Area of Eminence** :
8. **Present Occupation** :
9. **Achievements/Work Experience** :
   **(As per Annexure)**

**Date :**

**Place :** **Signature**

**(Full name of the candidate)**

ANNUXURE "B"

| Sr.No. | Post | Organisation | Period | | Details of Achievements/ Work Experience (in brief) |
|---|---|---|---|---|---|
| | | | From | TO | |

******

ANNEXURE "C"

**Details of Achievements/ Work Experience (in brief) of the Candidate applying for the post of State Chief Commissioner for Right to Service.**

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

----------------------.